[२०१९] १ एस.सी.आर. ८१५ -८१९

श्री. राजेंद्र ललितकुमार अग्रवाल

विरुद्ध

रत्ना अशोक मुरंजन आणि इतर

(दिवाणी अपील क्रमांक १३३१/ २०१९)

३१ जानेवारी, २०१९

[न्या. अभय मनोहर सप्रे आणि न्या. दिनेश माहेश्वरी]

दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ – कलम १००(४), (५) - दुसरे अपील – कायद्याचा सारभूत प्रश्न - वस्तुस्थितीनुसार, करारावर आधारित कराराच्या विनिर्दिष्ट कामगिरीच्या पूर्ती करिता दावा - कनिष्ठ न्यायालयाने हुकूमनामा पारित केला, परंतु , पहिल्या अपीलीय न्यायालयाने रद्द बातल केला - दुसरे अपील दाखल केल्यावर, कायद्याचा कोणताही सारभूत प्रश्न समाविष्ट नसल्याच्या कारणास्तव उच्च न्यायालयाने ते फेटाळून लावले – कायदेशीर समर्थन - निर्णय दिला : दस्तऐवज जसे की पक्षकारांनी मान्य केलेल्या करारातील अटी व शर्तींचा अर्थ लावणे, हा कलम १०० च्या अर्थांतर्गत कायद्याचा सारभूत प्रश्न आहे - उच्च न्यायालयाने करारातून निर्माण होणारा खरा हेतू, हक्क आणि जबाबदाऱ्या यांच्या संदर्भात कायद्याचा सारभूत प्रश्न उपस्थित करायला हवा होता - तसेच विनिर्दिष्ट कामगिरी मंजूर करण्याच्या किंवा नाकारण्यासाठी च्या

महत्वाच्या वाद मुद्द्यांवर प्रश्न निर्माण करता आले असते - उच्च न्यायालयाने कलम १०० (४) व (५) नुसार दिलेल्या अधिकारितेची व्याप्ती लक्षात न घेता पहिल्या अपिलाप्रमाणे दुसऱ्या अपिलाचा द्विपक्षीय निर्णय दिला - उच्च न्यायालयाचा दृष्टिकोन कलम १०० मध्ये नमूद आवश्यक तरतुदींशी सुसंगत नाही - त्यामुळे कायद्याचा सारभूत प्रश्न उपस्थित करून दुसऱ्या अपिलावर निर्णय घेण्यासाठी हे प्रकरण उच्च न्यायालयाकडे परत पाठविण्यात आले.

अपील मंजूर करत न्यायालयाने

निर्णय दिला : १.१ दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम १०० च्या अर्थांतर्गत या अपिलात कायद्याचा कोणताही सारभूत प्रश्न समाविष्ट नाही, असे उच्च न्यायालयाने मान्य करणे योग्य नव्हते. या अपिलात कायद्याचा सारभूत प्रश्न होता आणि आणि म्हणूनच, कलम १०० (४) अंतर्गत अंतिम सुनावणीसाठी तरतूद केल्यानुसार दुसरे अपील दाखल करतानाच तो उपस्थित व्हायला हवा होता. खरे तर कलम १०० (५) मध्ये अशी तरतूद आहे की, अपिलाची सुनावणी संहितेच्या कलम १०० (४) अन्वये उच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या कायद्याच्या सारभूत प्रश्नावरच होईल. [परिछेद ११] [८१८ - सी - डी].

१.२ दस्तऐवजाच्या कोणत्याही अटी व शर्तींचा अर्थ लावणे (जसे की या प्रकरणातील करार) संहितेच्या कलम १०० च्या अर्थांतर्गत कायद्याचा सारभूत प्रश्न आहे यावर वाद घालता येत नाही. हे विशेषतः त्यावेळी असते जेव्हा दोन्ही पक्षकार दस्तऐवजाला मान्यता देतात.

दस्तऐवजाचा अर्थ लावणे हा कायद्याचा सारभूत प्रश्न असल्याने उच्च न्यायालयाने सर्वप्रथम प्रकरणात उद्भवणारे योग्य महत्त्वाचे प्रश्न (प्रश्न) विशेषतः दोन्ही कनिष्ठ न्यायालयांच्या वाद कथनांच्या आणि उलट निष्कर्षांच्या संदर्भात करारातून उद्भवणारे खरे हेतू, हक्क आणि जबाबदाऱ्या यांच्याशी संबंधित प्रश्नांवर तयार करायला हवे होते आणि नंतर कलम १००(५) आणि त्याच्या परंतुक नुसार त्यांच्या अधिकारितेचा विचार करून तयार केलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास उत्तरवादींना सांगितले पाहिजे होते. याव्यतिरिक्त, विशिष्ठ दिलासा अधिनियमाच्या कलम १६ मधील आवश्यक तरतुदी , पक्षकारांचे वाद्कथन आणि खालील दोन न्यायालयांचे प्रति निष्कर्ष लक्षात घेऊन विनिर्दिष्ट कामगिरी करण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी महत्वाच्या असलेल्या वाद मुद्द्यांवर कोणता निष्कर्ष अधिक श्रेयस्कर आहे हे शोधण्याच्या दृष्टीकोनातून उच्च न्यायालय प्रश्न उपस्थित करू शकले असते. [परिछेद १२ - १४] [८१८ - ई - एच; ८१९ - ए]

१.३ आक्षेपित आदेश वाचल्यावर असे दिसून येते की, एकीकडे उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर दस्तऐवजाच्या अटींचा अन्वयार्थ लावला आणि दुसरीकडे , शेवटी, असे म्हटले की, यात कायद्याचा कोणताही सारभूत प्रश्न समाविष्ट नाही. त्यामुळे, अक्षरशः, संहितेच्या कलम १०० (४) आणि (५) नुसार दिलेल्या अधिकारितेची व्याप्ती लक्षात न घेता पहिल्या अपिलाप्रमाणे दुसऱ्या अपिलाचा ही द्विपक्षीय निर्णय घेण्यात आला. दुसऱ्या अपिलाचा निर्णय घेतांना उच्च न्यायालयाचा दृष्टिकोन कलम १०० मधील आवश्यक तरतुदींशी सुसंगत नव्हता. हा आदेश रद्द बातल ठरवत या प्रकरणात कायद्याचा योग्य तो सारभूत प्रश्न निर्माण करून

कायद्यानुसार गुणवत्तेच्या आधारे दुसऱ्या अपिलावर निर्णय घेण्यासाठी हे प्रकरण उच्च न्यायालयात पाठविण्यात येते. [परिछेद १५] [८१९ - बी - सी, ई - एफ]

दिवाणी अपीलीय अधिकारिता : दिवाणी अपील क्रमांक १३३१/ २०१९.

मुंबई उच्च न्यायालयातील दुसरे अपील क्रमांक ४४/२०१७ मधील दिनांक ०६.०८.२०१८ च्या न्यायनिर्णय व आदेशावरून.

अपीलकर्त्यांसाठी वकील मुकुल रोहतगी, वरिष्ठ वकील, मकरंद डी. आडकर, ब्रज के. मिश्रा, विजय कुमार, श्रीमती भारती त्यागी.

उत्तरवादींसाठी वकील आर. बी. सिंघल, वरिष्ठ वकील, आर.के.सिंह, श्रीमती रश्मी सिंग.

न्या. अभय मनोहर सप्रे यांनी न्यायालयाचा न्यायनिर्णय दिला

१. अनुमती दिली.

२. हे अपील मुंबई उच्च न्यायालया तील दुसरे अपील क्रमांक ४४/२०१७ मधील अंतिम न्यायनिर्णय आणि दिनांक ०६.०८.२०१८ च्या आदेशाविरुद्ध निर्देशित आहे ज्यात उच्च न्यायालयाने यातील अपीलकर्त्याद्वारे दाखल केलेले दुसरे अपील फेटाळले.

३. या अपिलात मध्ये असेलेल्या संक्षिप्त वादाचे मूल्यमापन करण्यासाठी, खाली काही समर्पक तथ्ये नमूद करणे आवश्यक आहे.

४. जो दिवाणी दावा ज्यातून हे अपील उद्भवते त्यात अपीलकर्ता हे वादी आहे तर उत्तरवादी हे प्रतिवादी आहेत.

५. अपिलकर्त्याने दाव्यातील मालमत्तेच्या संदर्भात कराराच्या विनिर्दिष्ट कामगिरीच्या पूर्ती करिता उत्तरवादी विरूद्ध दिवाणी दावा दाखल केला. सदर दावा हा दिनांक ०८.०८.१९८४ च्या करारावर हा आधारित होता. उत्तरवादी यांनी त्यांचे प्रतिवाद पत्र दाखल केले आणि अपीलकर्त्याचा दावा नाकारला. कनिष्ठ न्यायालयाने दिनांक ०५ .०७.२००४ च्या न्यायनिर्णय/हुकुमनाम्याद्वारे अपीलकर्त्याच्या दाव्यात हुकूमनामा पारित केला आणि उत्तरवादींविरुद्ध कराराच्या विनिर्दिष्ट कामगिरीच्या पूर्ती करिता हुकूमनामा पारित केला.

६. त्यामुळे व्यथित होऊन उत्तरवादींनी पुणे जिल्हा न्यायाधीश, पुणे यांच्या समोर पहिले अपील दाखल केले. दिनांक १०.११.२०१६ च्या न्यायनिर्णय/हुकुमाद्वारे प्रथम अपीलीय न्यायालयाने उत्तरवादींचे (प्रतिवादींचे) अपील मंजूर केले आणि दावा फेटाळून लावला. अपीलकर्ता (वादी) व्यथित झाला आणि त्याने उच्च न्यायालयात दुसरे अपील दाखल केले.

७. दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या कलम १०० अन्वये (पुढे "संहिता" म्हणून संबोधले जाते) आवश्यक असलेल्या कायद्याच्या कोणत्याही सारभूत प्रश्नाचा या अपिलात समावेश नाही, असे नमूद करून उच्च न्यायालयाने दुसरे अपील फेटाळून लावले, ज्यामुळे वादीने या न्यायालयात विशेष अनुमतीद्वारे प्रस्तुतचे अपील दाखल केले आहे.

८. या अपिलात विचार करण्याजोगा संक्षिप्त प्रश्न असा निर्माण होतो की, उच्च न्यायालयाने संहितेच्या कलम १०० च्या अर्थांतर्गत कायद्याचा कोणताही सारभूत प्रश्न त्यात समाविष्ट नाही या कारणास्तव वादीचे दुसरे अपील फेटाळणे योग्य होते का.

९. पक्षकारांच्या विद्वान वकीलांचे म्हणणे ऐकले.

१०. पक्षकारांच्या वकिलांचे म्हणणे ऐकून घेतल्यानंतर आणि खटल्याच्या अभिलेखाचे अवलोकन केल्यानंतर आम्ही अपील मंजूर करण्यास इच्छुक आहोत आणि आक्षेपित आदेश रद्द करत असतांना या प्रकरणात निर्माण झालेले कायद्याचे उचित सारभूत प्रश्न तयार करून कायद्यानुसार गुणवत्तेच्या आधारे दुसऱ्या अपिलावर निर्णय घेण्यासाठी हे प्रकरण उच्च न्यायालयाकडे परत पाठवीत आहोत.

११. अभिलेखाचे आणि कनिष्ठ न्यायालय, प्रथम अपीलीय न्यायालय यांचे न्यायनिर्णय आणि आक्षेपित आदेश याचे अवलोकन करता, विचारांती आमचे असे मत आहे की, या अपिलात संहितेच्या कलम १०० च्या अर्थांतर्गत कायद्याचा कोणताही सारभूत प्रश्न समाविष्ट नाही, असे उच्च न्यायालयाने मान्य करणे योग्य नाही. आमच्या मते, या अपिलात कायद्याचा सारभूत प्रश्न होता आणि आणि म्हणूनच, कलम १०० (४) अंतर्गत अंतिम सुनावणीसाठी तरतूद केल्यानुसार दुसरे अपील दाखल करतानाच तो उपस्थित व्हायला हवा होता. खरे तर कलम १०० (५) मध्ये अशी तरतूद आहे की, अपिलाची सुनावणी संहितेच्या कलम १०० (४) अन्वये उच्च न्यायालयाने उपस्थित केलेल्या कायद्याच्या सारभूत प्रश्नावरच होईल.

१२. दस्तऐवजाच्या कोणत्याही अटी व शर्तींचा अर्थ लावणे (जसे की या प्रकरणातील दिनांक ०८.०८.१९८४ चा करार) संहितेच्या कलम १०० च्या अर्थांतर्गत कायद्याचा सारभूत प्रश्न आहे यावर वाद घालता येत नाही. हे विशेषतः त्यावेळी असते जेव्हा दोन्ही पक्षकार दस्तऐवजाला मान्यता देतात.

१३. वर नमूद केल्याप्रमाणे, दस्तऐवजाचा अर्थ लावणे हा कायद्याचा सारभूत प्रश्न असल्याने उच्च न्यायालयाने सर्वप्रथम प्रकरणात उद्भवणारे योग्य महत्त्वाचे प्रश्न (प्रश्न) विशेषतः दोन्ही कनिष्ठ न्यायालयांच्या वाद कथनांच्या आणि उलट निष्कर्षांच्या संदर्भात करारातील अटी क्रमांक ३, ५ आणि १५ मधून उद्भवणारे खरे हेतू, हक्क आणि जबाबदाऱ्या यांच्याशी संबंधित प्रश्नांवर तयार करायला हवे होते आणि नंतर कलम १००(५) आणि त्याच्या परंतुक नुसार त्यांच्या अधिकारितेचा विचार करून तयार केलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्यास उत्तरवादींना सांगितले पाहिजे होते.

१४. याव्यतिरिक्त, विशिष्ठ दिलासा अधिनियमाच्या कलम १६ मधील आवश्यक तरतुदी , पक्षकारांचे वाद्कथन आणि खालील दोन न्यायालयांचे प्रति निष्कर्ष लक्षात घेऊन विनिर्दिष्ट कामगिरी करण्यासाठी किंवा नाकारण्यासाठी महत्वाच्या असलेल्या वाद मुद्द्यांवर कोणता निष्कर्ष अधिक श्रेयस्कर आहे हे शोधण्याच्या दृष्टीकोनातून उच्च न्यायालय प्रश्न उपस्थित करू शकले असते.

१५. आक्षेपित आदेश वाचल्यावर असे दिसून येते की, एकीकडे उच्च न्यायालयाने दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकल्यानंतर दस्तऐवजाच्या अटींचा अन्वयार्थ लावला आणि दुसरीकडे ,

शेवटी, असे म्हटले की, यात कायद्याचा कोणताही सारभूत प्रश्न समाविष्ट नाही. त्यामुळे, अक्षरशः, संहितेच्या कलम १०० (४) आणि (५) नुसार दिलेल्या अधिकारितेची व्याप्ती लक्षात न घेता पहिल्या अपिलाप्रमाणे दुसऱ्या अपिलाचा ही द्विपक्षीय निर्णय घेण्यात आला. आमच्या मते, दुसऱ्या अपिलावर निर्णय घेतांना उच्च न्यायालयाचा दृष्टिकोन कलम १०० मधील आवश्यक तरतुदींशी सुसंगत नव्हता.

१६. मात्र, उत्तरवादींच्या (प्रतिवादी) वकिलांनी जोरदारपणे असा युक्तिवाद केला की, उच्च न्यायालयाचे निष्कर्ष, जे 'पुष्टी' करणारे आहेत, ते कोणत्याही हस्तक्षेपाची मागणी करत नाहीत परिणामी महत्त्वाच्या मुद्द्यांवर दावा फेटाळला गेला, परंतु, आमच्या मते, उच्च न्यायालयाने आता कायद्याचा सारभूत प्रश्न उपस्थित करून गुणवत्तेच्या आधारे या मुद्द्याची नव्याने तपासणी करावी. त्यामुळे ज्या मुद्द्यांचा आग्रह धरला आहे, त्याच्या गुणवत्तेवर आम्ही कोणतेही मत व्यक्त करत नाही.

१७. वरील चर्चेच्या अनुषंगाने आम्ही खटल्याच्या गुणवत्तेत प्रवेश करणे टाळत या मताशी येतो की हे प्रकरण परत पाठविले जावे आणि अपील मंजूर करत आणि आक्षेपित आदेश रद्द बातल करत, अपील मान्य करण्यासाठी आणि संहितेच्या कलम १०० (४) नुसार प्रकरणात उद्भवणारे उचित सारभूत प्रश्न (प्रश्न) तयार करण्याची विनंती करून प्रकरण उच्च न्यायालयात परत पाठवतो आणि नंतर आमच्या कोणत्याही निरीक्षणाने प्रभावित न होता कायद्यानुसार संहितेच्या कलम १००

(५) नुसार तयार केलेल्या प्रश्नांची उत्तरे देऊन गुणवत्तेच्या आधारावर दुसऱ्या अपीलात निर्णय देण्यात यावा.

१८. अशाप्रकारे, अपील मंजूर करण्यात येत आहे. आक्षेपित आदेश रद्द बातल करण्यात येत आहे.

निधी जैन अपील मंजूर .

- x - x - x - x - x - x – x -

<u>अस्वीकरण</u>

या न्यायनिर्णयाच्या मराठी भाषेतील या अनुवादाचा वापर हा पक्षकारास त्याच्या/ तिच्या मातृभाषेमध्ये त्याचा अर्थ समजून घेण्यापुरताच मर्यादित राहील आणि त्याचा इतर कोणत्याही कारणाकरता वापर करता येणार नाही तसेच इंग्रजी भाषेतील न्यायनिर्णय हाच सर्व व्यावहारिक आणि कार्यालयीन वापराकरिता विश्वसनीय असेल आणि तोच त्यातील आदेशाच्या निष्पादन आणि अंमलबजावणी करता वैध मानला जाईल.

- x - x - x - x - x - x – x -